म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १८०५
१८८१

# गंधवणा

गजमल माळी

REFBK-0011768
REFBK-0011768

मराठवाडा साहित्य परिषद प्रकाशन

मराठवाडा साहित्य परिषद

૩૮૨૧૫
૧૩।૧૧/વ
સં. ૨।।
વાલા

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३८७७५ वि: काव्य
क्रमांक १५८७५ नोंद वि:

# गंधवेणा

- गजमल माळी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ११७६८
REFBK-0011768
REFBK-0011768

मूल्य : रुपये १·५०

मराठवाडा साहित्य परिषद
मराठवाडा साहित्य परिषद् प्रकाशन

—प्रा. भगवंत देशमुख यांस

प्रकाशक : मराठवाडा साहित्य परिषद्
औ रं ग पु रा ,       औ रं गा बा द .

सर्व हक्क स्वाधीन.
म. सा. परिषद्, औरंगाबाद.

म रा ठ वा डा सा हि त्य सं मे ल न
२१ जानेवारी १ ९ ६ १.
मूल्य : १·५०

वेष्टन : य श वं त मा ळी , मुं ब ई .

मुद्रक : जयहिंद प्रिंटिंग प्रेस,
मालक : भारत मुद्रक आणि प्रकाशक लि.,
स रा फा ,       औ रं गा बा द .

—प्रा. भगवंत देशमुख यांस

# प्रकाशकाचें पान

नवोदित लेखकांचें आणि कवींचें साहित्य सुलभतेने रसिकांपुढे यावें म्हणून मराठवाडा साहित्य परिषदेने 'पुरस्कृत ग्रंथप्रकाशना'ची योजना हातीं घेतली आहे. प्रस्तुत योजनेंतील हें चौथें प्रकाशन.

मराठवाड्यांतील नवोदित कवींत श्री. गजमल माळी यांच्या कवितांचें एक विशेष स्थान आहे. विविध नियतकालिकांतून त्यांच्या कविता आजवर प्रसिद्ध झालेल्या आहेत. प्रस्तुतच्या संग्रहांत त्या संकलित स्वरूपांत पहिल्यानेच रसिकांपुढे येत आहेत. जाणत्या रसिकांच्या मनांत श्री. माळी यांच्याविषयी निर्माण झालेल्या अपेक्षा प्रस्तुतच्या 'गंधवेणे' ने अधिक उंचावतील असा विश्वास वाटतो.

प्रस्तुत कवितासंग्रह प्रकाशित करण्याच्या कामांत ज्यांचें ज्यांचें सहकार्य लाभलें त्या सर्वांची परिषद् आभारी आहे.

न. शे. पोहनेरकर
अध्यक्ष
मराठवाडा साहित्य परिषद्.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम .................... दि: ....................
क्रमांक .................... नों दि: ....................

गेल्या पंधरा वीस वर्षांत मराठी कविता किती बदलली आहे, तिचें भावविश्व, ह्या भावविश्वांत वावरण्याची तिची पद्धति, तिचा पदन्यास व तिची बोलण्याची भाषा ह्या सर्वच बाबतींत किती बदल झाला आहे हें लक्षांत घ्यावयाचें असेल तर मर्ढेकर, पु. शि. रेगे किंवा विंदा करंदीकर यांची कविता वाचण्याची आवश्यकता नाहीं. त्यासाठीं गजमल माळीसारख्या एखाद्या तरुण नवोदित कवीची कविता वाचली तरी पुरें आहे. आजची कविता बोलते; आणि पंधरा वीस वर्षांपूर्वीची मराठी कविताहि बोलतच होती; परंतु दोघींच्या बोलण्यांमागील हेतूंत थोडा फरक आहे; ती सतत कांहींतरी समजावून देत होती, ही कांहींतरी सतत समजावून घेत आहे: पहिलीला प्रत्येक वेळीं जणूं कांहींतरी पूर्ण समजलेलें असे व म्हणूनच तें ती समजावून सांगूं पहात असे. स्वाभाविकच तिचें हें बोलणें वर्णनात्मक किंवा निवेदनात्मक स्वरूपाचें असें: तिच्यांत अवतरणाऱ्या प्रतिमा देखील कांहींतरी समजावून सांगण्यासाठींच येत असत. ह्या गेल्या पंधरा वीस वर्षांतील कवितेला कांहीं तरी समावून सांगावेसें क्वचित्‌च वाटतें: आपल्याला एखादी गोष्ट पूर्ण समजली आहे असें तिला कधींच वाटत नसावें; तिची धडपड सतत कांहींतरी स्वतःच समजून घेण्याकडे आहे असें दिसतें. म्हणूनच तिच्यांत निवेदन, स्पष्टीकरण, वर्णन, कल्पनाविस्तार ह्यांचा जवळजवळ अभावच जाणवतो. ती थोडीशी स्वतःशींच गुणगुणत असते, स्वतःतच मशगुल दिसते. जें जाणवत असतें, उत्कटपणें जाणवत असतें तें मनाला अस्वस्थ करीत असतें; हें मन कविमन. तेव्हां ही अस्वस्थता एका कलावंताची अस्वस्थता असते. निर्मितीसाठीं धडपडणारी, अरूपाला रूप देऊं पाहणारी, तें रूप दिलें जात असतांच त्यानें बेहोष होणारी व त्या बेहोषींत मूळ जाणिवेचा शब्दरूपानें सतत शोध घेणारी अशी ही अस्वस्थता असते. तेव्हां ह्या अस्वस्थतेंतून जी

निर्मिति होते ती जितकी बोलकी तितकीच अबोल असतें: ती निर्मिति जणूं आपणासमोरच झालेली असते-होत असते; कविता वाचतांना आपणांस हा अनुभव येत असतो; येथें आपण केवळ श्रोते नसून आपली भूमिका थोडी वेगळी असते; आपणाकडून आणखी कांहीं गोष्टींची अपेक्षा केली जात आहे हें आपल्या लक्षांत येते. ही अपेक्षा म्हणजे आपणासमोर होत असलेल्या निर्मितींत प्रत्यक्ष भाग घेण्याची. कविता वाचतांना आपण स्वतः ह्या निर्मितींत कवीबरोबर मग भागीदार होऊं इच्छित असतों; आपली त्या दृष्टीनें धडपड असते. कवितेचा अर्थ लागणें म्हणजे ही धडपड यशस्वी होणें, कवीबरोबरच कवीला अस्वस्थ करून सोडणाऱ्या त्या जाणिवेचें सम्यक्‌रूप, त्या रूपांतील आगळें सौंदर्य आपल्याला जाणवणें.

आणि हेंच नेमकें कठिण जातें. ह्यासाठीं ह्या निर्मितीकडे सर्व अवधान द्यावें लागतें, शब्दा-शब्दांवर रेंगाळावें लागतें, ते देत असलेल्या भावार्थांच्या सूचना झेलाव्या लागतात; आणि एवढें करूनहि जें अव्यक्त राहतें तें कल्पनेनें निर्मावें लागतें; परंतु ह्यांत एक प्रकारचा आनंद असतो. एवढ्या धडपडीनंतर जें डोळ्यासमोर येतें तें प्रेक्षणीय, श्रवणीय व विचारणीय असेल तर घेतलेल्या श्रमांचें सार्थक झाल्यासारखें वाटतें. श्री. गजमल माळी यांची सदर संग्रहांतील कविता वाचतांना हें समाधान मला अनेकदां लाभलें. माळी यांच्याबरोबर त्यांच्या विविध अनुभूतींचें शब्दद्वारां रूप लक्षांत घेत असतां मनाला अनेकदां एका सौंदर्यलोलुप दृष्टीची जवळून ओळख झाली.

माळी ह्यांची ही सौंदर्यदृष्टि आज तरी पु. शि. रेगे, बा. सी. मर्ढेकर, वसंत बापट, मंगेश पाडगांवकर, ह्यासारख्या प्रकृतीनें थोड्याफार वेगवेगळ्या असणाऱ्या कवींच्या सौंदर्यदृष्टीवर पोसलेली आहे. हें सर्व अभावितपणें झालें; तें होणें थोडेंफार अपरिहार्य आहे. ह्यांत अनुकरणाचा भाग असल्यास अत्यल्प आहे. ह्या वेगळ्या कविमनांशीं एक तरुण होतकरू कविमनाचा अगदीं स्वाभाविक संवाद होत आहे; एकमेकांची भाषा एकमेकांना कळत आहे-नव्हे एकमेकांची होत आहे. माळींची कविता वाचतांना मधूनच सदानंद रेगे आठवतात, पु. शि. रेगे आठवतात त्यामागील इंगित हें आहे. आज अनेक कविमनें अशा रीतीनें एकमेकांशीं अगदीं स्वाभाविकपणें संवादी

बनत आहेत : त्यांची अनुभव घेण्याची व त्याला शब्दरूप देण्याची पद्धति ह्यांत विलक्षण साम्य जाणवत आहे. गजमल माळी आज तरी त्याच अवस्थेंत आहेत; आणखी कांहीं काळ कदाचित् ते त्या अवस्थेंत राहतीलहि : वरच म्हटल्याप्रमाणें हें थोडें अपरिहार्य आहे, परंतु आपण गजमल माळी यांची कविता स्वतःच्या भाषेंत केव्हां बोलूं लागते याचीच वाट पाहणार. तिला आपलें स्वत्व केव्हां गवसतें तें बघत राहणार. ज्याची सौंदर्यदृष्टि चोखंदळ आहे आणि औचित्यविचार पक्का आहे तो स्वत्वाला जपल्याशिवाय राहणार नाहीं. माळींची कविता ही खास 'माळींची' होईल अशी खात्री वाटते ह्याचें कारण तिच्यांतून आजहि व्यक्त होणारी निखळ सौंदर्यदृष्टि आणि तिच्यांत अंगभूत असणारा औचित्यविचार.

माळी हे तरुण आहेत आणि साधारण तरुण मनाचें भावविश्व हेंच माळी यांचें भावविश्व आहे. ह्या विश्वांत निसर्ग आणि प्रेमभाव यांना स्वाभाविकच फार मानाचें स्थान मिळालें आहे : माळी यांची सौंदर्यदृष्टि सध्या तरी ह्या दोन भावविषयांशीं सलग्न असणाऱ्या विविध अनुभूतींतील सौंदर्य टिपण्याचा प्रयत्न करीत आहे. निसर्गाच्या विविध भाववृत्तींचें दर्शन घडविणें हा सदर सौंदर्यदृष्टीचा एक आवडता छंद आहे : प्रसन्न, उदासीन, विकल अशा विविध वृत्तींनी भारावलेला निसर्ग आपणांस माळी यांच्या कवितेंत वरचेवर भेटतो; परंतु हीं निसर्गचित्रें नेहमींच केवळ निसर्गाचीं भावचित्रें राहत नाहींत; ह्या निसर्गाच्या भावचित्रांमध्यें एका तरुण मनाच्या प्रेमभावाचे रंग सहज मिसळले जात असतात. ह्या प्रेमभावाची डूब त्या निसर्गचित्रांना आपोआप मिळत असते : त्यामुळेंच कीं काय कोणास ठाऊक तीं अधिकच जिवंत भासतात.

माळी यांच्या कवितेंतून डोकावणारा हा निसर्ग खानदेश–मराठवाड्यांतील निसर्ग आहे; तेव्हां त्यांत कोंकणांतल्या किंवा गोमांतकांतल्या निसर्गासारखें अंगभूत सौंदर्य बेताचेंच आहे : उलट एक प्रकारचा रखरखीतपणा आहे : भेगाळलेलीं काळीं शिवारें, 'पेटलेल्या–डोंगरकडा', 'वृक्षांचे सापळे,' 'जळालेल्या पंखांचीं पांखरें', 'उदासपणें पसरलेलें लांबच लांब रेताड' अशांचीच येथें भाऊगर्दी आहे; परंतु गजमल माळी यांची कविता ह्यांतूनच

सौंदर्य निर्माण करिते. खरें म्हणजे ज्या क्षणीं हीं सर्व दृश्यें माळी यांच्या भावजीवनाचा भाग बनतात त्याच क्षणीं त्यांच्या रुक्षतेंतून सौंदर्य डोकावूं लागतें. ज्योत्स्नेचा प्रकाश पडतांच जें विरूप आहे तेंहि सुरूप बनावें त्याप्रमाणें : कारण ज्या सौंदर्याचें दर्शन माळी आपणांस घडवीत असतात तें खरें म्हणजे निसर्गाचें सौंदर्य नसतें, तर एका भाववृत्तीचें सौंदर्य असतें. तें सौंदर्य फक्त गोचर होत असतें निसर्गरूपानें. मला वाटतें सर्वच श्रेष्ठ दर्जाच्या निसर्गकवितेंत हेंच होत असावें. एका मनाच्या भाववृतीचें सौंदर्य साकार, सरूप करण्यासाठीं त्या मनाशीं एकरूप झालेला निसर्ग तेथें प्रगट होत असावा. माळी यांची कविता खानदेशाच्या मरुभूमींत ठिकठिकाणीं सौंदर्यलता फुलविते ती ह्याच जादूनें.

माळी यांची कविता अजून तरी लाजरी-बुजरी आहे, ती मुग्धा आहे, ती एक अर्धवट उमललेली कलिका आहे. तिची शब्दकळा, तिचा पदन्यास, तिचे विभ्रम ह्या सर्वच गोष्टी तिचें आजचें हें अर्धस्फुट स्वरूप व्यक्त करितात असें मला वाटतें. ह्या अर्धस्फुट स्वरूपांत मुग्धावस्थेचें आगळें सौंदर्य आहे : त्यांत नाजुकपणा आहे, आपल्या रूपाची, यौवनाची लाजरी का होईना पण गमतीदार जाणीव आहे; नटण्यामुरडण्याची यौवनसुलभ हौस आहे; संकोच आहे तशीच क्वचित् आत्मप्रदर्शनाची ऊर्मीहि आहे, भावसौंदर्याबरोबरच स्पर्श, रस, रूप, गंध ह्यांतील उन्मादक सौंदर्याची चव तिला कळलेली आहे, व त्या अनुभूतींनीं अनेकदां तिचें अंगप्रत्यंग थरारून जात आहे. असें होतें तेव्हां तिचा आकर्षकपणा विशेषच जाणवतो, तिच्या अभिव्यक्तींत विलक्षण ताजेपणा, टवटवीतपणा येतो :

> फुले फुलांत स्पर्शवेल
> दिठींत शब्द गंधले,
> नसांत, मोगरी फुलांत
> चांदणेंहि थेंबले.

असें जेव्हां ती गुणगुणूं लागते तेव्हां आपणहि बेभान होतों; ही आपणांस अस्वस्थ करण्याची शक्ति तिच्या ठिकाणीं आज खात्रीनें आहे.

परंतु आजचें तिचें हें भावविश्व मर्यादित आहे. तिच्या मागच्या मनाची सौंदर्यदृष्टि चोखंदळ असली तरी त्या मनाचा आवाका अद्याप बेताचाच आहे. त्याची झेप फारशी मोठी नाहीं, त्याच्या चिंतन-विषयांच्या कक्षाहि मर्यादित आहेत. ही कविता आपल्या बोलण्याची 'भाषा' अद्याप शोधीत आहे, तिला ही 'भाषा' अद्याप संपूर्णपणें सांपडलेली नाहीं, तिची 'भाषा' ही म्हणूनच अद्याप क्वचित् मर्ढेकरांची, पु. शि. रेग्यांची, सदानंद रेग्यांची किंवा पाडगांवकरांची आठवण करून देत आहे. आपली स्वतःची 'भाषा' संपूर्णपणें न सांपडणें म्हणजे एका दृष्टीनें आपलें स्वत्वच संपूर्णपणें न गवसणें होय. माळी यांना हा स्वत्वाचा शोध अद्याप लागावयाचा आहे. त्यांच्या कवितेंत नटण्यामुरडण्याची अद्याप आवड दिसते ती ह्यामुळेंच. तिच्यांत थोडाफार घाबरटपणा आढळतो तो ह्यामुळेंच. तो एक प्रकारें 'आत्म'-विश्वासाचा अभाव आहे. हा 'आत्म'-विश्वास वाढला पाहिजे. विचारांत, अभिव्यक्तींत एक प्रकारचा मोकळेपणा अवतरला पाहिजे. आज जी मुग्ध आहे; ती खऱ्या अर्थानें प्रौढा झाली पाहिजे : आपल्या ठिकाणीं असणारें सामर्थ्य ती वाढीला कशी लावते ह्याकडेच आतां रसिकांचें लक्ष आहे.

मराठवाडा विद्यापीठ
औरंगाबाद. } - **वा. ल. कुळकर्णी**

माझा हा पहिलाच काव्यसंग्रह. प्रा. भगवंतराव आणि श्री. अनंतराव भालेराव यांनी मला पहिल्यापासून उत्तेजन दिलें. गेल्या दोन वर्षांपासून प्रा. वा. ल. कुळकर्णी यांच्याहि प्रेमाचा लाभ घडत आहे. मी त्यांना विनंती करतांच; त्यांनी प्रस्तावना लिहून दिली. त्यांचे आभार मानावेत अशी अवस्था नाही. शिवाय शब्दांना एवढें मोल येईल का ?

मराठवाडा साहित्य परिषदेने आपणहून माझें पुस्तक काढून मला कायमचें ऋणी केलें आहे.

जयहिंद प्रेसचे व्यवस्थापक श्री. जगन्नाथराव बर्दापूरकर आणि माझे चित्रकार स्नेही श्री. यशवंत माळी यांनी पुस्तक सजविण्यांत घेतलेल्या परिश्रमाबद्दल त्यांना धन्यवाद.

यांतील कविता 'सत्यकथा, छंद, भारतीय कविता, प्रतिष्ठान, साधना, धारा, दीपलक्ष्मी, नवें लेखन' इत्यादि नियतकालिकांतून प्रथम प्रकाशित झाल्या.

मिलिंद महाविद्यालय,
औरंगाबाद.

– गजमल माळी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम.......................... वि: ........................
क्रमांक .......................... नों दि: ...................

अमृत पाहिलें
सागराच्या कुशीं;
कल्लोळ मानसीं
जळीं न्हालों.

* *

## अंतरांत कोंभ नवे

कालोखांत अंकुरतें
विश्व–तुझ्या जाणिवेचें;
क्षितिजाच्या डहाळीला
फूल येतें उंबराचें.

डोहाळतें अंतराळ
अंतरांत कोंभ नवे;
–जळांतल्या चंद्रम्याला
पंख तुझे…तुझे हवे !

# मी

माझ्या हृदयाची
एक तार काढ;
तुझ्या वीणेला पुरेल अशी.
छेड ती, उठव निनाद…
उमटेल माझें व्यक्तित्व त्यांतून.

फुटतील अस्तित्वाचे पंख मला
आदिमानवाच्या खोपटांत तेव्हां.
किलबिलणारें व्यक्तित्व तें– मी
क्षितिजामधला ध्रुवतारा मी.

* *

११७६८

## शेंग उन्हाची

दूर...निसुळत्या टेकाडावर
मूक तरूची कलती छाया;
पवन्याचें अन् गवत लपवितें
चंद्रफुलाची पिवळी काया.

चंद्रफुलाची पिवळी काया
तुझ्या नसांतुन फुलते आहे;
चोचीमधल्या बेदाण्यांतुन
शेंग उन्हाची उलते आहे !

* *

## वाट चांदणी जळते

वाट चांदणी जळते
धग लागते चंदनीः
मेल्या मनाचं ईप्सित
फुलें पेटल्या इंधनीं.

ओठ्यावर एकटीच
खेळ पाहते…थकते !
आणि आकाश पानांत
चोच हळूच खोवते.

उभें झाड मोहरतें
फांद्या मनांत शिरतीः
…जून हादग्या खालती
लाख साळुंक्या बोलती…

आरींग मीरिंग
लवंगा तीरिंग
लवंगा तीरीचा
डुगडुग बाजा
गया गोपिका
उतरला राजा…!

* *

# राधा

बघे सावळी
धरणी राधा;
कृष्ण-घनाची
सकाळ छाया.

इंद्रगोप खग
उडे, उफाळे
केळबनाची
उभार काया.

—या केळीची
झाली मीरा;
खळाळणारा
ओहळ कान्हा.

गोकुळांतल्या
अन् धरणीच्या
नसानसांतुन
फुटला पान्हा...

* *

## एक रात्र

एक रात्र : चंद्राची भरती
एक रात्र : जुळलेल्या तारा;
एक रात्र : धुंदींत स्पर्शाला
तळयांतल्या मातीला वारा.

क्षणापुन नित झुरतो वारा
—त्या आगीची जाग निराळी—
फुंकित, फिरतो जखम रेशमी
या क्षितिजांतुन सांजसकाळीं...

* *

## कलत्या उन्हांत

कलत्या उन्हांत –
सांज साऊली
घालते घोळ
मेघाच्या बनांत.

कलत्या नभांत
पेर्ते तारा
पहिला शिरवा
मयुर मनांत

कलत्या मनांत–
नेसते हिरवी
चुनडी, उमा
नवोढा भुई.

खळ्याळ सरींत
भिजली गव्हाळ
तुझीच प्रतिमा
बनून रुई !

* *

# ओढ

निळ्या डोंगराची भाषा
कांहीं कळतां कळेना;
अंध आभाळाला जाग
भर दिवसा येईना.

येतें पोटरींत नभ
रित्या मेघांनीं भरून;
चोच मातीची उलते
गार ओलाव्यावाचून.

नाही दुःखाला या रूप
नाही सुखालाहि वाट;
तुझ्या अस्तित्वाची येथें
नाही फुटत पहांट.

...कोऱ्या शब्दांची पापणी
तरी मिटतां मिटेना;
मुक्या जाणिवेची ओढ
कांही सुटतां सुटेना.

## चित्र

क्षितीजाला बिलगलेल्या
ओल्या डोंगररेषा,
न्हातात;
शिरव्यांत मृगाच्या
तूं आल्यावर.

तूं आल्यावर,
लागून असते झड
टप…टप…टप
त्यांत तुझें टिपगाणे

"…पावसांत असं फिरतांना
अंग असं झुलतांना
मन अगदीं फुलून येतं.
शब्दांना कोंभ फुटतात
वृत्ति कशा बहरून येतात…"
तुझी एकतारी.

"…तुझ्या ओळखीचा तपस्वी
तो पायथ्याचा गुल्मोहर
तसाच आहे पावसांत–
उन्हांत.
तो मात्र हिरवळला नाही
पालवला नाही;
निष्पर्ण…निस्पंद."

माझा बेसूर
एकतारींत मिसळतांना
तुझ्या डोळ्यांत मृग थेंबतो
अगतिक होऊन!

* *

अनुक्रम........................ दि: ..................
क्रमांक ........................ नों दि ..................

यमुनेच्या पाण्याचे ओहळ
वाहतात डोळ्यांत माझ्या,
वाहतात धारा ओसरणाऱ्या–
ओसरलेल्या.

पहांटते एकच एक प्रतिमा
...ती शपथ गळ्याची
साऊलींतल्या घनाची
साऊलींच्या बनाची.

माझा कदंबी रुसवा
फुलांत फुलतो लाल लाल.
स्मृति–फुलांनीं लखलखलेलें
असेंच फुलतें बन कदलीचें;
उषःपंख कावळ्यांची
रोज भरते शाळा जेथें.

सरावांतली वेळ ही सरते
–या वाऱ्याची लहर जशी ही–
अर्धी जाग...अर्धी निद्रा
हातीं गुंफण चंद्र–दळाची
बोटांची साखळी छातीवर
निजलेली शेजारी...
नागफणीच्या विळख्यामधले
हुंदळत येतें स्वप्न निळें अन्
खुणावतें मज, वदतें

"हवीच होती अस्तित्वाची
तमा तरी जगण्यांतुन अनुदिन.
हवीच होती सागरवेणा
क्षितिजामधल्या अग्नि–फुलांना;

फुटला असतां वेंचित वेंचित
त्या शब्दांना अर्थ दिवाणा!

समूर्त झालें असतें मीपण
या गंधांतुन, त्या अर्थांतुन
–या मातींतुन.
इथें, तिथेंची नसती झाली
महात्म्यांची तीर्थ–स्थानें
शालवृक्षाच्या फांदींत नसतें
घरटें केलें–
युगकुस नसती फुलली.
पुन्हा पुन्हाच्या हुंकारानें
वेणावलाहि नसता शब्द...”

* *

## ओझें

झेललें आकाश
इवल्या थेंबांत;
कर्पुर अंगांत
तुझेपण.

वाकलों ओझ्यानें
ठणकत माथा;
तुझेपण आतां
पेलवेना.

* *

# कांठ

जेव्हां चांदण्याला होतें
वेड;-अबोलपणाचें.
आणि सागरवेलीला
दु:ख चिरविरहाचें.

भुऱ्या छायांच्या जाळीच्या
ओठीं ओठंगले शब्द;
हिर्व्या वाऱ्याची पांखरं
झाली खोपटांत स्तब्ध.

तेव्हां स्मृतींची गोपिका
चढे यमुनेचा घाट;
भरे डोहांत कंपन
शहारतो ओला कांठ...

## विसरायचे म्हणशील जेव्हां

विसरायाचे म्हणशील जेव्हां
रुतेल वाळू नसानसांतुन;
आणि सागरी भिंग रुपेरी
जाईल सखये, असे दुभंगून.

श्रावणांतल्या सरींत हिरव्या
ग्रीष्मामधली झरेल आग;
बसतां चटका तीक्ष्ण विजेचा
स्वप्नभूमिला येईल जाग.

आकाशाला पडतील छिद्रें
चंद्र-रवींचे होतील फत्तर,
त्या दगडावर कोरत बसशिल
मम प्रश्नाचे अबोल उत्तर.

जिरेल हट्टी नागील मस्ती
अभिमानाची गळतां कांत;
डोळ्यावरची नुरेल धुंदी
खुपेल हृदयीं जहरी रात.

* *

## गांठ

गोकुळांत गवळण
राधा, नितळ यमुना;
मुक्या मुक्याच मिटल्या
ओल्या कृष्णाच्या भावना.

कदंबाच्या तरूवर
आज थिजल्या वासना;
वळवुन गाई-गुरें
गोकुळेशी फिरे कान्हा.

वृंदावनीं रास-क्रीडा
खेळ, गोपींचा चालेना;
ढगा आड बांधलेली
गांठ चोळीची सुटेना.

# तुझी निःशब्दाची भाषा

तुझी पटली ओळख
भिजलेल्या चांदण्यांत;
वाऱ्यावर सोडलेले
उष्ण आठवती श्वास.

दबलेल्या गवताच्या
नको दाखवूस खुणा;
आठवते सारें सारें
तुझा स्मरतो उखाणा...

आज आठवते, होतीं
तेव्हां चांदण्याशीं नातीं;
नदी कांठावर दोघे
झालों होतों तृणपातीं.

मिटलेल्या पाकळ्यांनीं
होती चोरलेली नीज;
आणि गार पुळणीची
आठवते, होती शेज.

तुझी पटली ओळख —
ओलांडलिस तूं रेषा;
आतां दुरून संकेत
तुझी निःशब्दाची भाषा...

* *

## तुलाच लाजुन

पौषामधल्या
थंडीलाहि,
चैत्र उन्हाची
झाली कावीळ.

सकाळलेलें
ओठ कोवळे
सुकले, पुसलें
या क्षितिजाच्या
डोळ्यामधलें
ढगाळ काजळ.

या अवनीची
पाठ तडकली;
उन्हांत न्हाऊन
उन्हांत गाऊन.

शिवारांत अन्
टचकन् फुटली
'शेंग' गव्हाची
तुलाच लाजुन
तुलाच लाजुन.

## थांब जराशी

थांब जराशी
पानजाळीच्या आडोशाला;
हिरव्या लवत्या फांदीपाशीं
जिथें
थबकला
गर्भरेशमी
स्वप्नथवा
ग स्वप्नपऱ्यांचा.

थांब जराशी
निळया सावळया
थरथर ओल्या
धुंद सागरी लाटेवरती···

थांब जरा ग,
ठेव हनुवटी
चंद्रकोरीच्या
पंखावरती.
फुलव तुझे अन्
पंख मखमली
घेऊन गिरकी···

* *

## मोहळ

इथें वेंचलें उन्हांत भलल्या
चोचीमधले स्नेहल दाणे;
बूच तरूच्या छायेखालीं
अनंग झालें स्वप्न दिवाणें...

अनंग झालें स्वप्न दिवाणें
सुजाणतेला आली भोवळ;
अजाणतेच्या फांदीवरती
येऊन बसलें सुढाळ मोहळ!

* *

## युगायुगांनीं

युगायुगांनीं तसे जाहलों
तूं राधा, मी कृष्ण कन्हैया;
जळांत न्हाली निळसर तसल्या
स्वप्न-पऱ्यांची उनाड दुनिया.

नसानसांतुन लाख चांदण्या
झिणझिणल्या यमुनेच्या कांठीं;
त्या हंसण्यांतुन, रुसण्यांतुन त्या
शुभ्र चांदणें रुजलें ओठीं.

दिठींत आलें भरतें…तसलें!
जडावला तृप्तीचा डोळा.
…यमुनेच्या पाण्यांत उतरला
आकाशाचा चुकार बगळा…

विस्कटली केसांची गुंफण
उन्मळलें मौनाचें मंदिर;
थबथबली तृप्तीनें रेती
थबथबलें त्या दिवशीं अंबर.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ११६८८

## आली शब्दांना जांभई

कोर चंद्राची फुटते
स्मित टिपते डहाळी;
पानापानांत मनाच्या
प्रीत नाचरी आभाळी.

बकुळीच्या ओठावर
लाख ठसे चुंबनाचे;
उमटती फुलावर
रंग तुझ्या अबोलीचे.

वेडी मालतीची वेल
न्याहळते खुळे चाळे;
...होते बावरी चांदणी
ढग लोटीत सावळे !

— अस्से कित्ती छळायाचें ?
पेंगे परसांत जाई;
कोर मालवली दूर...
आली शब्दांना जांभई.

## क्षितिज उभें डोळयांत

क्षितिज उभें डोळयांत सांजतें;
चंद्र-उन्हाची नसांत शिंपण...
गोकुळल्या वाळूंत चालते
रात्ररात्र शब्दांची गुंफण...

हार हार ताऱ्यांचा अर्धा
जळांत विरतो जुळल्यावाचुन;
क्षितिज निळें डोळयांत गोठतें
उन्हांत कलत्या-उन्हांत राहुन.

* *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम.................... दि: ..................
क्रमांक .................... नोंद दि: ..................

## माझें विसावलें ऊन

खाली तृणाची जावळ
झाली होती थेंबातुर;
काळ्या सावळ्या मेघाचा
आला भरूनिया ऊर.

मेघमल्हार गाऊन
होत्या पांगलेल्या तारा;
काळ्या कुरळ्या केसांना
होता चाळवीत वारा.

होता चाळवीत वारा
होती साडी सावरीत;
गंधथेंबांनीं अंगांत
होता मेघ उतरत...

—होतों खोपटीं वेंचित
कांहीं अमृताचे कण;
होतें उबेंत कुशीच्या
माझें विसावलें ऊन.

* *

## पक्षी

रात्रीमागून कितीक गेल्या रात्री
बुडणाऱ्या चांदण्यांचे;
गणित सोडविल्याविण
गहन खोल निळाईंत.

लाटालाटांमधून
कितीक पुसल्या नक्षी—
पापणीच्या आटलेल्या
गढूळ भुऱ्या डोहांतून.

अन् कितीक झुकले पक्षी,
चिंब मनाच्या
किर्र निळया छायांच्या
रित्या मेघखंडांतून.

* *

## अमूर्त व्यक्तित्वाचे सापळे

तुझ्या माझ्या आठवणींतून
पसरलें आहे हिरवेगार पडीक रान.
ऋतुस्नात वाहतात ओढे,
सूर्यांच्या लाख डोळयांना फितवून.
खडकहि दुभंगतो लाटेने.

—इथें कसा तडा जातो?
चरे उमटतांना,
ओल्या मातीला छेद जातो.
निर्जीव रेषांचें जाळें पसरतें
शिल्पित; लाख टाच्यांनीं
अमूर्त व्यक्तित्वाचे सापळे.

* *

## गोंदणथेंब माझे नाहीत

तारखांबांना फुटलेल्या वीजदिव्यांचे कोंभ
मरगळलेत्. रावव वेळेचा प्रहर.
उसवलेली छाती शिवून घे रात्रीची;
पापाचे टाचे घालतांना प्रकाश पुरेल.

एक एका टाच्यासह एक एक स्वप्न वीण
गंधार्त ओळीचें. आर्द्र पापणी मीट ना,
उष्ण श्वासांचा मिठी डोळ्यांत दुखेल.
स्मृतींना उकरूं नकोस ग यावेळीं,
माझ्या मनाला नख लागेल.

जांभुळाच्या रेषा पुस त्या कोरलेल्या;
रेषारेषांतुन उमटेल ना क्षितिजाची निळी व्यथा.
विस्कटलेल्या केसांनीं पायथ्याकडे पाहूं नकोस ग
चोरतील गीत मेघवनांत उडालेले पक्षी!

पुन्हा मात्र उसवूं नकोस, प्रकाशांत दिवा लावून;
छातीवरचे घाव. गोंदणथेंब माझे नाहीत.

* *

## हरवलेलें हिवें नभ

ही सागराची वेदना
किती दिवस साहणार आहेस?
किती दिवस चालणार आहेस
ह्या पाण्याच्या पाऊलवाटा?

किती दिवस झिरपेल
ही डोळ्यांतील यमुना?
किती दिवस तुझें हें
वाळवंटाचें स्वामीपण?

नसांतून पाझरणारा तम
अजून गोठला नाही का?
अजून आटलीं नाही का
काळोखाचीं थारोळीं?

गतिवेड्या पायवाटा
असीमतेंत पळतात का?
अंकुरलेलें हिवें नभ
अजून तसे लपतें का?

हरवलेलें हिवें नभ
अजून तसे झुकतें का?

## शिंपल्यांत मोतीं

“कुठे निघाली जावया
अशी विसरून आण;
सात जन्माची सोबत
देतों आभाळलें मन.

ओंजळींत आसवांना
पंख फुटतील रातीं;
स्वाति नक्षत्र, जपून
आहे शिंपल्यांत मोतीं.”

## हरवलेलें हिर्वें नभ

ही सागराची वेदना
किती दिवस साहणार आहेस?
किती दिवस चालणार आहेस
ह्या पाण्याच्या पाऊलवाटा?

किती दिवस झिरपेल
ही डोळ्यांतील यमुना?
किती दिवस तुझें हें
वाळवंटाचें स्वामीपण?

नसांतून पाझरणारा तम
अजून गोठला नाही का?
अजून आटलीं नाही का
काळोखाचीं थारोळीं?

गतिवेड्या पायवाटा
असीमतेंत पळतात का?
अंकुरलेलें हिर्वें नभ
अजून तसे लपतें का?

हरवलेलें हिर्वें नभ
अजून तसे झुकतें का?

* *

## दुःख

फुलकोंभांतुन
सकाळतो वास;
अमृताची आस
आग लावी.

अमृताचा थेंब
ओठांत मावेना;
दिठींत वेदना
वेणावते.

कर्दळीचें फूल
विझलें शेजेंत;
आगीच्या मिठींत
हिमसेक.

अतृप्तीचें मन
विझलिया पेटें;
सुख उफराटें
दुखावतें.

* *

## कोर

निजलेली घट्ट मिटून
डोळ्यांचे सोनपंख;
भुवईच्या रेषांतुन
झिमझिमलें सुख अथांग...

बोटांचीं चंद्र-दळें
केळफुलीं रुतलेलीं;
मेघांच्या पालवींत
कोर, तशी झुकलेली.

कोर तशी झुकलेली
झुकलेलें अंग अंग,
सुकलेल्या ओठांवर
जुळलेले स्वर अनंग.

* *

## शब्दाबाहेरची

शब्दाबाहेरची
तुझी माझी प्रीत;
हावऱ्या क्षणाची
तुझी माझी नीज.

दिल्या ओठांवर
चंदनाची उटी.
फुटे गात्रांतुन
श्रावणाचें गीत!

सोनगालांवर
आर्त हिमरात
निजलेली. तशी
पांखराची रीत.

शब्दाबाहेरची
तुझी माझी प्रीत.

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम...................... दि: ..............
क्रमांक ...................... नों दि ..............



थांब तिथें तूं;
ओंजळींतल्या लाख चांदण्या
जिथें सांडल्या
उगवतीच्या गहिऱ्या काळोखांत.

किती वेचशील ?
ओली सागरमाती काळोखी.
पसर विस्कटलेले केस,
वाऱ्याच्या झोतानें झुलतांना
दिसतील काळया मेघांच्या रांगा.
उगवतील न्हाऊन तारकांचे पुंज,
केसांत तुझ्या.

ओली सागरमाती पाहील
प्रकाश मिणमिणता.

* *

# घर

क्षितिजांत उल्का एक
जळीं झाली मासा.
रेशमाच्या शालीवर
कशिद्याचा ठसा.

इवलाले डोळे निळे
इवलाले तुरे;
जळांतल्या घरामधी
जळवंती झुरे.

क्षितिजाचें निळें रूप
जळामधी भिजें;
घर पुन्हा भेटल्यानें
अंग अंग सजे.

* *

## परस्था

उधाणले ओठ
ओठीं शांत झाले;
वादळणें आले
ओठीं माझ्या.

तुझ्या मिठीमधी
शांत व्हावी भाषा;
मूक तूं परस्था
आली गेली.

* *

## आटला गा झरा

पाण्यावर शिळें मौन
डहुळलें जरा;
तुटलेल्या उरांतील
आटला गा झरा.

तुळशीच्या झाडाखालीं
जपायाचा दिवा;
काळोखांत वावटळी
सोबत काजवा.

खाली माती काळोखाची
दिगंतरीं तारा.
लागायचा कुठे कसा
पांखराला थारा !

चालायाची वाट अशी
रक्त-गंध-हीन;
घरव्यांत टिटवीचें
दुभंगलें मन.

पाण्यावर शिळें मौन
डहुळलें जरा;
तुटलेल्या उरांतील
आटला गा झरा.

## दंवथेंबांनीं कशी

दंवथेंबांच्या सरी
झेलिल्या कमळ पापणीवरीः
गंध जळे भुरभुरा,
पाहतीं नक्षत्रें अंबरीं...

शब्दहीन साऊल्या
पसरल्या लांबटः वृक्षावरी.
चंद्र झुरे बावरा
उमलत्या स्वप्नपऱ्यांच्या परी.

जडावतां पापणी
उमलती श्वासांच्या वल्लरीः
दंवथेंबांनीं कशी
भिजे मी चंद्रलता उर्वशी?

* *

## मौनगंधा

या मोगरी फुलांत
तुझा रुसवा दडला आहे.
आणि पानांत
डोळयांतील तेजाचा शिडकावा.

कधी प्यालीस चंद्रपाणी?
तुझ्या ओठांवर
आज तें ओघळलं आहे.
बघ ना,
ओठहि कसे हट्टी
गारव्याच्या उत्तररात्रींच
तहान लागली आज यांना!

तूं नको ना अशी ओणवूंस,
निश्चयी हाताचं बळ
नाही पेलणार तुला.
डोळ्याच्या पापण्या मिटून तरी
किती स्वप्नांचीं झुंबरं टांगशील?
झुंबरागणिक माझी वासना दडली असेल.
तुलाच,
ही गुंतावळ उकलणं कठीण जाईल.

किती सायासानं हात दुमडशील?
छातीवरचं ओझं वाढवशील उगीच...
उकल ना हातांची गुंफण,
उशाखालीं निजलेलें क्षितिज
पाहणार नाही कमळाची उमलण...

सुगंध तरी किती पेरशील
श्वासांत जुईचा...
जुईच्या फुलकळीवर
किती टिपशील गंधखुणा;
उरशील अशीच टेकाड्यांत शेजारच्या.

किती लपेटून घेवू मनाभोवतीं
तुला,
तुझ्या अस्तित्वाच्या खुणा.
या खुणांतुन आकारशिल
मिठींतली तूं—
संकोची. मौनगंधा.

* *

## शब्दांची आरास

शब्दामागे शब्द
साखरेचा रवा;
भाव माझा देवा.
रिता हातीं.

नाही कुठे, कधी
ओलावला बोल;
हेलावलें जळ
नाही कधी.

कसा देवूं सांग
नैवेद्याचा घास;
शब्दांची आरास
इथें तिथें.

* *

## यात्रा

प्रकाश व्यापून उरणारी निळाई
माझी होती.
माझी होती—सात समुद्राच्या पऱ्यांची रात्र.
आंबट चवीनं उष्टावलेलं गात्र
तेव्हांच तूं पोपट केलेंस.
—सोन्याचा पिंजरा
मोत्यांचा चारा.
पोवळ्याचें पाणी
सुखाचा निवारा—

तुझ्या अंगणांतील, त्या उंच उंच
झाडांच्या हिरव्या झुबक्यांत;
टांगतं ठेवलंस.
तुला दिसावं असं, तूं दिसावीस.
रोज पाहतों येथून आतां
आषाढ घनाची यात्रा
नित्य तुझ्या डोळ्यांत भरते.

## अमित्रा

निथळते थेंब थेंब
उभी जास्वंद कुंवार;
आर्द्र थरक फुलांचें
ऊर झुलतें उभार.

ताज्या सुवासानें ओलें
अंग भारलें क्षणांत;
उधाणल्या आषाढाच्या
सरी झडल्या मनांत.

तिची डंवरली काया
गात्रीं पालवत तेज;
पानापानांत फांदीनं
हास्य फुलविलं आज.

...मी ही अमित्रा, बुंध्याशीं
चिंब भिजल्यें उन्हांत...
भावशील शब्दावळ
अडलेली अहंतेंत!

* *

## कथाई

क्षितिज माझें लाल होतें
मखमलीची वाट होती;
मी अशा वेचून तारा
गुंफलेली माळ होती.

लक्षिली नाहींस तेव्हां—
माळ माझी लक्षपुष्पी;
सागरी पाण्यांतली अन्
चांदण्याची भावनक्षी.

जाळसी गंधांत कां तूं
देठ; तुटल्या हादग्याचें ?
कोरलें वाळूंत असतां
शिल्पमिटल्या अक्षरांचें.

शिल्पमिटल्या अक्षरांची
खूण ताजी गंधवेणा;
गात मी गीतांत जगतों
काळ ओठीं पोळतांना.

रेषमी कोषांत आतां—
काजव्यांची रोषणाई;
वाच तूं गीतांत सारी
वाच ही माझी कथाई !

* *

## मोळी

अंथरलें ऊन
पायतळीं, वाळू…
फाटलेले माळू
पर्णभार.

शिरावर मोळी
अनवाणी वाट;
चढवेना घाट
रक्तहीन.

किती पाय टाकूं
ढगांच्या साऊलीं,
जिवाची कायली
काय करूं!

भावपूर्ण शिल्प…
मार वरी घाव
संज्ञाहीन जीव
तुटूं दे गा.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम........................ वि: ..............
क्रमांक ........................ नों दि ..............

## अनुक्त

ठिबकल्या तमानें
ओंजळ भरली;
अजून वाट भिजत नाही...
करपलेल्या ओठांवर
शब्दांच्या लाह्या;
चोच कशी भरत नाही?
क्षितिज, क्षितिज ओलांडलं
ठिगळ ठिगळ सांधित,
—असं फाटकं प्राक्तन.
विटलेल्या पंखांची
रोज नवी झालर,
तीच पुन्हा जुनी खोड
अनुक्त शब्दांचं पुरलेलं धन.

* *

## जळतों मी अखंड

नाही ग,
नाही साहवत प्रकाशाची तिरीप,
साहसी डोळ्यांत नाही मावत
कवडशांची रांगोळी...
किती मी टिपून घेवूं
ओठांची गार शिंपण?
जळतों मी अखंड—
हिमालयाच्या शयनगृहांत.

* *

# रंगदेण

शब्दांत हरवलेल्या क्षितिजाचा
फिक्कट निळा रंग;
तुझ्या डोळयांत साठवून ठेव.
अपुऱ्या चित्राची,
रंगदेण करायची आहे.
विखुरलेल्या सांजमेघाचं
स्वप्निल रेशिम लाघव,
तसंच पाझरतं असूं दे
भुवयांच्या जांभुळ रेषांतुन…
मला तें टिपायचं आहे.

* *

## माझें आकाश

उदासपणें पसरलेलें
हें लांबच लांब रेताड;
भोगावतीचा कर्णकटु रव.
तसूतसूंत साठलेला
कांपरा अंधार...
चित्कारत घुमणारी
वाघुळ रांग, तिची फडफड.
एकांतांत झुलणारा
कंदिलांच्या किरणांचा पाहारा.
तिथें रेताडांत जळणारें
तुझें सरण. त्याचा प्रकाश.
प्रकाशांत जळणारा मी; माझें आकाश.

* *

## आली वेदनेला जाग

तुझ्या कोमल दांताचा
आहे गालांवर व्रण;
तुझ्या प्रेमळ कराची
आहे दंडावर खूण.

तुझा व्रण, तुझी खूण
आज लावताहे आग,
शेवंतीच्या ताटव्यांत
आली वेदनेला जाग.

## कधी कधी–

कधी कधी या कातरवेळीं
आकाशाला होतें चेटुक;
पेंगुळलेल्या काळोखाचें
धुनकुन उरतें इवलें श्रोटुक.

नीरवतेच्या तुटती धमन्या
धापूं लागतो प्रभाततारा;
सायंपासुन पेंगुळलेला
जागुं लागतो वसंतवारा.

पिंगट आशा पुरवुनी आणि–
कुणी अवलिया झिंगत निवतो;
जीर्ण उराच्या सताड दारीं
पिवळी पिचकी सूर्य टाकतो...!

* *

## वेचणी

हिरवा शामल सागर
तरंगणारीं टिंबें वीजदिव्यांचीं,
फुटतात तशी, हीं कापूस-बोंडें
हिरव्या हिरव्या जर्द उन्हांत.

मेर शिवेवर उभी युगाची
करून ओचे,
नितंबिनी, मी सुधिरा.
घेतें वेचून,
अजर मनाच्या
श्वेत पाकळ्या
फुटलेल्या वावरांत हिरव्या.

* *

क्र. ११८६८

## धूसरलेल्या स्वप्नीं....

नित धूसरलेल्या स्वप्नीं
मी विणीत बसतों धागे...
परि कधीं न जुळती जुळती
जें विटलें...तुटलें...मागे.

वर आकाशीच्या तारा
तळीं निळसर शामल पाणी;
मधी वडाखालच्या छाया
अन् झुलती वेड्यावाणी.

मधु हरित पर्णांमधुनी
थरथरती गंधित वारे;
ठिबकतें चांदण्यामधलें
तें गूढ–मना सलणारें.

पाण्यांत प्रतिबिंबातें
एकटेंच बघुनि झुरतों...
नदिकांठ आणिक प्रस्तर
उरामधीं हळहळतो.

ती पुळणीवरची जागा
त्या खुणा...बंगले...देउळ
पुळणींत निर्मिलीं आपण
मावळण्या त्यांतचि केवळ...!

तुज होतें माहित सारें
कां गुंफिलेस तूं धागे?
तें कधीं न जुळती जुळती
जें विटलें...तुटलें मागे.

## तृप्तीचे अभंग

१

तुझ्या ओठांवर
जुळविलें ओठ;
भावनांचे कांठ
एक झाले.
स्तनांभोवती मी
वेटाळले हात;
बोटांच्या नसांत
पुण्य प्यालों.

२

आसवांनीं तुझे
ओलावले बोल;
डहुळलें जळ
तळ्याकांठीं.
तळ्याकांठीं आतां
उष्ण झाले श्वास;
तृप्त झाली आस
बोला आधी.

## मनाचे श्लोक

भोगावतीच्या तीरावरती
घोकत असतें देऊळ राम;
गाभाऱ्यांतील ऊद बरळतो,
"दामावाचून मिळेल काम."

घाट धुण्याचा सुस्त लोळतो
एक जांभई देऊन छान;
पाण्याशीहि नकळत जुळते
बैराग्याची सुरेल तान.

बत्तीस पिल्लीं घेऊन फिरतें
डुकर भुरकें शोधित कणकण;
अन् कुत्रीचीं ' मुलें ' नदीवर
पोटासाठीं बघती ' वैरण '.

उगाळिते अन् स्मशानांत कुणी
चुडेल, मुडकें हाड तुक्याचें
इथेंच गातो रामू नियमित
घोळून घोळून श्लोक मनाचे.

* *

...ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम........................ दि: ..................
क्रमांक ........................ नों दि: ..................

## ग्वाही

तेजाब दिठींत
पोळल्यें पुरी मी
सगुणा; संयमी
राहूं कशी?

विसर म्हटल्यें
बासरी बावरी...
जखम सागरी
भरूं कशी?

कदंब पेटला
पेटलें गोकुळ;
यमुनेचें जळ
नेऊं कशी?

पेटले पाहिजे
तुलाहि, मलाहि;
अस्तित्वाची ग्वाही
देऊं कशी?

## साऊल्यांचें बन

आल्या दाराशीं साऊल्या
उन्हें वाकलीं पिवळीं;
ओल्या हळदी मनांत
स्वप्न उमलें नव्हाळी.

कुठे करकरे वाट
रथ फिरला माघारा;
कुठे घुंगरांचा नाद
आला शोधित निवारा.

दारीं वाजलीं पाऊलें
शीळ घुमली सुढाळ;
जातां सामोरा, झुकला
डोळा हावरा ओढाळ.

—आणि स्पर्श उमटतां
अंगीं लाख लाख फुलें
...फांदीखालीं झुकलेलें
साऊल्यांचें बन झुलें.

* *

## लेणें

चोच वासलेली रिती
आंत भरलेलं मन;
खोल गहन डोहांत
जळ, जळ साठवून;

उभी गंधार्त होवून
वंशवनांतील वाट.
अर्थमय साऊल्यांत
भिजे पोळलेला घाट.

याच घाटावर होतें
ओल्या कमळाचें लेणें;
स्पर्शल्याचे वळ लक्ष
मूक आभाळाचें जिणें...

* *

## चांदण्याच्या पाऊलांची

चांदण्याच्या पाऊलांनीं
सरलेली संध्या;
गंधगार रात्रीच्या कुशींत
मिटलेल्या चार पापण्या.
दहा पेरांनीं मोजलेलं
हें अनंताचं अंतर.
—ह्या टेकाड्यांत विसावलेली
हाडांची ओढ, नसांतील रक्त.
ओल्या ओल्या मातींतून
उमटलेले स्पर्शाचे लक्ष लक्ष वळ.
वळावळांनीं घेतलेला आकार...
रेषारेषांचं जाळ.

या जाळयांतून पाझरणारी तृप्त जाग.
चांदण्यांच्या पाऊलांची;
सरलेली गंधगार रात.

## माझी क्षितिजाची व्यथा

आज दुखावला कणा
बुजलेल्या जाणिवेचा;
आणि उसवला छेद
माझ्या मनांत नभाचा.

आतां शून्यामागें शून्यें
जातीं शून्यांत विरून;
—गंध जळतो, जळतो
भिजलेल्या मातींतून.

दूर व्यापली हवेनें
सारी विश्वाची पोकळी;
नागमोडी धूरवाट
निळ्या भिडली आभाळीं.

...सागरांत उमटली
माझी क्षितिजाची व्यथा!
दारीं अवसेची रात
वेची वेदनेची कथा.

* *

## अर्थहीन

ग्रीष्मामधल्या उन्हाच्या
तुटतात लाह्या लहरीलहरींनीं;
काळ्या शिवारांत
              काव्याकुड्या वेचतांना,
हरवतात नव्हाळ डोळे;
दूर-पेटलेल्या डोंगरकडांत...
पापणी ओलावते.
चुडा किणकिणतो.
नादाचीं वलयें जातात वलयांमागून
पेटलेल्या डोंगरकडांत मावळतात.
चित्र उमटतें.
आकृति सरकतात.
डोंगर कोसळतात.
जळालेल्या पंखांचीं पांखरं
येतात चित्कारत;
वृक्षांचे सापळे धरतात फांद्यांची...
पापणी ओलावते.
चुडा किणकिणतो.
भरलेला हात वर सरकतो
कपाळाचें अंतर मोजीत अर्थहीन...

* *

## पांखरांच्या गीतांत तूं

या दंवाच्या घोसांतुन
तुझ्या खुणा कशा उमटतात?
उष्ण निःश्वासांनीं कशीं हलतात
हीं झाडांचीं पानं?

इंद्रधनूच्या रंगांतुन
कधी दिसतात तुझीं हळदीं पाऊलं?
कधी? केव्हां?
या दरींतुन तुला जाग येते?

कधी भरतेस शब्द
या; पांखरांच्या गीतांत तूं?
कधी सांधतेस क्षितिज;
फाटलेलें विरक्त तूं?

* *

## गंधवेणा

गंध शेंदरी सांडती
देठ देठ खुडतांना;
उसवते एक एक
सर्वें मनांतील वेणा.

कशी ओंजळ भरावी
अशी वठलेली रात;
जिथें फुलायाची घाई
तिथें मावळते जाग.

* *

# जयिष्णु

शब्द गळतात,
सराईत पापण्या वेचीत नाहीत.
असते स्वप्नमग्न अजिंठ्याच्या
शिल्पासारखी;

स्तब्ध, स्तब्ध.
तिच्या गच्च मिटलेल्या ओठांवर उमटते
नकाराची काळोखरेखा. नेहमीची.
ओळखीची.
माझा उतावीळ जयिष्णु बोल
पंख फुलवितो,
भरलेल्या मेघांचा कानोसा घेत.

* *

## फुले फुलांत स्पर्शवेल

फुले फुलांत स्पर्शवेल
दिठींत शब्द गंधले;
नसांत, मोगरी फुलांत
चांदणेहि थेंबलें.

करांत गुंफिता दळें अन्
दळांत थेंब पाझरे;
नभांत पांगल्या मनांत
सुभग गीत मोहरे.

पापण्यांत थरक वीज
उष्ण श्वास दीर्घले;
मिठींत अवळितां कुणास,
सांद्र विश्व लोपलें...

फुले फुलांत स्पर्शवेल
स्तब्ध, एक गंधिता;
क्षितिज मिसळलें जळांत
साऊलीस शोधितां.

* *

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २१७६८
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम........................ वि: ....................
REFBK-0011768
REFBK-0011768